भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५१६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १८/०७/२०१७

**१) संगनमत करुन विवाहीतेस पैश्यासाठी शारीरीक व मानसिक त्रास दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २५/०७/२०१७ चे पासुन यातील फिर्यादीचे आरोपी क्र. १ सोबत निांक २१/०२/२०१६ ला गंधर्व विवाह झालेला असुन लग्नानंतर २५/११/२०१६ पासुन आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीस पैशाची मागणी करुन फिर्यादीला शारीरीक मानसिक त्रास दिल्याने महिला सुरक्षा विषेश कक्ष भंडारा येथे तक्रार केली होती तरी देखील आरोपीता सोबत फिर्यादीची तडजोड न झाल्याने महिला सुरक्षा विषेश कक्ष भंडारा यांचे पत्र क्र. वि. समु. केन्द्र/ ८२०/२०१७ कार्यालय पो. अधि. भंडारा दिनांक ०३/०७/२०१७ चे व फिर्यादींचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४९८(अ),३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चांदेवार पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**२) बोलेरो पिकअप चालकांच्या निष्काळजीपणे चालवुन वाहनास धडक देवुन वाहनाचे नुकसान केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १७/०७/२०१७ चे ०७.३० ते ०८.०० वा. दर. यातील फिर्यादी उत्तम शेषराव ठाकरे वय ५१ वर्ष, रा. कन्नमवार नगर वार्ड क्र. १७ ता. जि. गडचिरोली हे आपले वाहन क्र. एम. एच. १२/००२९ ने जात असतांना यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपने चालवुन फिर्यादीचे वाहनास खापरी येथे धडक देवुन अपघात होऊन वाहनाचे नुकसान केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९ भादंवि. सहकलम १८४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. चुटे पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**३) संगनमत करुन अनाधिकृतपणे प्रवेश करुन महिलेस क्षुल्लक कारणावरुन भांडण व अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन मारपीट करण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०७/०७/२०१७ ते ०९/०७/२०१७ चे १२.१५ वा. दर. यातील चारही आरोपीतानी फिर्यादीचे डायनिंग रुम मध्ये येवुन शौचालयाचे काम का करु देत नाही म्हणुन भांडण व अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन मारपीट करण्याची धमकी दिल्याने फिर्यादींचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४४८,२९४,५०६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चांदेवार पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**४) घरात प्रवेश करुन लाखडी आलमारीचे कुलुप आलमारीमधील स्कुल बॅगचे पर्समधील सोन्या व चांदीचे दागीण्याची चोरी . :–**

दिनांक १६/०७/२०१७ चे १२.३० ते १८.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी जैनलाल धामलाल दमाये वय ४२ वर्ष, रा. बपेरा यांचे खुल्या घरी दिवसा कोणीरती अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन घरात प्रवेश करुन माचघरातील लाखडी आलमारीचे कुलुप काढुन आलमारीमध्ये स्कुल बॅगचे पर्स मध्ये ठेवलेला १ सोन्याचा मंगळसुत्र ८ ग्रॅम, सोन्याचे कानातील झुमके ४ ग्रॅम, सोन्याची नाकातील फुल्ली १ ग्रॅम, चांदीचे पायल व जोडवे ६ तोळे असा एकुण २७,५००/–रु. चा माल चोरीस गेला असुन फिर्यादीने यातील संशयीत आरोपीवर चोरुन नेल्याचा संशय व्यक्त केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ३८० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. परतेकी पो.स्टे. आंधळगाव हे करीत आहेत.

**५) संगनमत करुन क्षुल्लक कारणावरुन भांडण करुन बासाच्या काठीने जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १७/०७/२०१७ चे १७.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी महेश साधुराम भोसकर वय ३० वर्ष, रा. टाकाळी याने पत्नीस आधारकार्ड, फोटो व टि.सी. मागीतली असता तिने भांडण करुन देण्यास नकार दिला अशी कशी देत नाही असे फिर्यादी बोलला असता यातील तीनही आरोपीतांनी संगनमत व भांडण करुन बासाच्या काठीने फिर्यादीचे उजव्या डोळयाजवळ व डावे हातावर मारुन जखमी केल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. महालगावे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**६) अवैध दारु/जुगार अडयावर धाडी . :–**

दिनांक १७/०७/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे आंधळगाव, लाखणी व करडी येथे अवैध दारु/जुगार अडयावर धाडी घालुन एकुण ०३गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन २० लिटर हातभट्टी दारु किंमती १०००/–रु. तसेच ९०० लिटर मिली देशी दारु किंमती २५०/–रु. तसेच जुगारातुन किंमती २६२/–रु. असा एकुण किंमती १,५१२/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.